अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ ची शपथेवर जबाब

माझे नांव — बाबुराव गोविंदराव लोखंडे,

माझे वय – ७८ वर्ष , धंदा : सेवानिवृत्त

राहणार – हडको, संभाजीनगर, ता. जि. संभाजीनगर.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. एन.आर.बी कर्मचारी सहकारी पतसंस्था या संस्थेमध्ये उप लेखापरिक्षक म्हणुन मी दि.०१.०४.१९९८ ते सन २००४ पर्यंत कार्यरत होतो. दि.०१.०४.१९९८ ते ३१.०३.२००० या कालावधीतील सदर संस्थेचे ऑडीटचे काम माझ्याकडे आले होते. ऑडीट दरम्यान मी वरील कालावधीतील सर्व कॅशबुक, प्रोसिडिंग, जमा खर्चाचे वावचर, सभासदांचे कर्जवाटप व वसुलीचे कागदपत्रे, संस्थेचे बॅंक पासबुक व चेकबुक पाहिले. वरील सर्व दस्ताऐवज पडताळणी केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, विजय ट्रेडर्स या नावाने संस्थेने चेक दिले होते परंतु संस्थेला त्यांचे देणे नव्हते. संस्थेने विजय ट्रेडर्स यांच्याकडुन १२५ टिव्ही संच ₹२२,०२,०००/– खरेदी केले होते. सदर टिव्ही संच खरेदी करण्यासाठी संस्थेने रुबी बॅंक पुणे शाखा यांच्याकडे कर्ज मागणी केली होती व त्याप्रमाणे कर्ज मंजुर होऊन कर्जाची रक्कम विजय ट्रेडर्स यांच्या खात्यात जमा केली होती.

०२. कॅशबुक वावचर पाहिल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, वावचर नसतांना काही रक्कम खर्च करण्यात आली. विजय ट्रेडर्स यांना देणे नसतांना संस्थेने ₹१,५०,०००/–, ₹१,००,०००/– व ₹१,२५,०००/– असे एकुण ₹३,७५,०००/– धनादेश क्र.९९३९ दि.०९.०६.१९९९, धनादेश क्र.९९४० दि.०९.०६.१९९९ व धनादेश क्र.२५७९१ दि.१५.०६.१९९९ व्दारे दिले परंतु दाखविताना बॅंक भरणा रुबी बॅंक असे दाखविले. सदर ₹३,७५,०००/–रक्कमेची अफरातफर आरोपी बाबुराव कावळे व ठकाजी तमखाने यांनी केली असे लक्षात आले. त्यावेळी आरोपी बाबुराव कावळे संस्थेचे चेअरमन होते व ठकाजी तमखाने सचिव होते. त्याप्रमाणे मी ऑडीट रिपोर्ट संस्थेला सादर केला.

०३. ऑडीट दरम्यान मला असे आढळुन आले की, वार्षीक सभेत मंजुरी न घेता सभासदांना लाभांश म्हणुन रक्कम ₹३९,९२०/– अदा केली. सदरची रक्कम संस्थेला मिळालेल्या नफयाची होती. वार्षीक सभा खर्च वावचर नसतांना ₹२१,०००/– खर्च दाखविले. तसेच प्रिटींग व स्टेशनरी चे वावचर नसतांना ₹१०,६००/– खर्च दाखविला. किरकोळ खर्चाचे वावचर नसतांना ₹५५००/– खर्च दाखविले. सभा झालेली नसतांना सिटींग फीस पोटी ₹३४६२/– खर्च दाखविले. पावत्या नसताना सत्कार खर्च ₹५८००/– दाखविला. वावचर नसतांना प्रवास खर्च ₹५३०/– दाखविला. वावचर नसतांना वकिल फी ₹४०००/– दाखविला. वावचर नसतांना लिखान खर्च ₹२०००/– दाखविला. वावचर नसतांना ब्लँकेट खरेदी ₹१९९९/– दाखविला. असे एकुण ₹९४,८११/– रुपये खर्च नसतांना खर्च दाखविला. सदर रक्कमेची अफरातफर आरोपी बाबुराव कावळे व ठकाजी तमखाने यांनी केली असे लक्षात आले.

०४. दि.२४.०४.१९९९ रोजी खर्च नसतांना चहाचा खर्च ₹१६५०/– दाखविला. दि.२४.०४.१९९९ रोजी वावचर नसतांना ₹१२८०/– किरकोळ खर्च दाखविला. दि.३०.०४.१९९९ रोजी वावचर नसतांना सत्कार खर्च ₹१२००/– दाखविला. दि.३०.०५.१९९९ रोजी वावचर नसतांना किरकोळ खर्च ₹१२००/– दाखविला. असा एकुण ₹५३३०/– खर्च व वावचर नसतांना खर्च दाखविला. सदर रक्कमेची अफरातफर आरोपी बाबुराव कावळे व ठकाजी तमखाने यांनी केली असे लक्षात आले.

०५. वरील प्रमाणे रक्कम ₹३,७५,०००/– व वावचर नसतांना एकुण ₹१,०७,४३१/– खर्च दाखवुन अफरातफर केल्याचे दिसुन आले. त्यानंतर मी विजय ट्रेडर्स, बाबुराव कावळे व तमखाने यांना कारणे दाखवा नोटीस दिली. परंतु त्यांनी काही उत्तर दिले नाही. त्यानंतर ऑडीट रिपोर्ट तयार करुन जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग–१ सहकारी संस्था जालना यांना दिला. सदर संस्थेने देखिल विजय ट्रेडर्स व आरोपींना नोटीस दिली परंतु त्यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे मी लेखी फिर्याद दाखल केली.

आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६९** देण्यात येते. आरोपी बाबुराव कावळे यांना मी ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. सचिव तमखाने मयत झाले आहेत.

०६. मुळ ऑडीट रिपोर्ट दाखल केला आहे. आता मला दाखविला असता तो तोच आहे. त्यावर प्रत्येक पानावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७०** देण्यात येते. जप्त मुद्देमाल आता मला दाखविण्यात आला. संस्थेचे दि.१०.०८.१९९८ व सन १९९८–१९९९ रोजीचे जप्त प्रोसिडिंग बुक आता मला दाखविण्यात आले. ते तेच आहेत. सदरचे प्रोसिडिंग बुकची मी ऑडीट दरम्यान पडताळणी केली होती व हिरव्या शाईच्या पेनाने तपासणी केल्याच्या खुणा आहेत. सदर प्रोसिडिंग बुक यास अनुक्रमे **नि.क्र.७१ व ७२** देण्यात येते. आता मला संस्थेचे जमा खर्चाचे वावचर असलेले वावचर चिकट बुक दि.०१.०४.१९९८ ते ३१.०३.१९९९ व एप्रिल १९९९ ते जुन १९९९ रोजीचे दाखविले. सदरच्या चिकट बुकाची मी पडताळणी केली होती. त्यास अनुक्रमे **नि.क्र.७३ व ७४** देण्यात येते. आता मला संस्थेचे एप्रिल १९९८ ते दि.२८.११.१९९८ रोजीचे कॅशबुक दाखविले. ते तेच आहे. त्यावर चेअरमन व सचिव यांच्या नावाचा शिक्का व सही आहे. सदर कॅशबुकची मी पडताळणी केली होती. त्यास **नि.क्र.७५** देण्यात येते. आता मला संस्थेचे दि.३०.११.१९९८ ते दि.१५.०९.१९९९ रोजीचे कॅशबुक दाखविले. ते तेच आहे. त्यावर चेअरमन व सचिव यांच्या नावाचा शिक्का व सही आहे. सदर कॅशबुकची मी पडताळणी केली होती. त्यास **नि.क्र.७६** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एन. के. कोहिरे यांच्यामार्फत –</u>**

**अर्ज नि.क्र.७७ अन्वये आरोपी स्वतः साक्षीदाराचा उलटतपास करणार असल्याने साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे स्वतः –**

०७. एन.आर.बी कर्मचारी सहकारी पतसंस्था या संस्थेचे ऑडीट करण्याकरीता मला नियुक्त केले त्याबाबतचा आदेश दाखल केला नाही. संस्थेचे दोन वर्षाचे ऑडीट करण्यासाठी मंजुरी मिळाली होती परंतु मंजुरी आदेश अभिलेखावर दाखल केला नाही. मी दि.२५.०४.२००० ते दि.२६.०४.२००० रोजी संस्थेचे ऑडीट केले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी संस्थेचा पदाधिकारी होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी संस्थेचे ऑडीट माझ्या पाठीमागे केले आहे. साक्षीदार सांगतो की, ऑडीट करण्यासाठी संस्थेला पत्र दिले होते. हे मला माहिती नाही की, कारणे दाखवा नोटीसचे उत्तर मी लेखापरिक्षक कार्यालयाला दिले होते. हे मला माहिती नाही की, कार्यालयाने दिलेल्या नोटीसेस देखिल मी उत्तर दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खर्चाचे सर्व वावचर संस्थेमध्ये उपलब्ध होते. हे मला माहिती नाही की, आमच्या कार्यालयाला सर्व वावचर व पावत्या दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, वावचर नसतांना खर्च दाखविला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ऑडीट करण्यासाठी माझी नियुक्ती केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमध्ये नमुद सर्व रक्कमा खोटया आहेत.

०८. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणुनबुजुन खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ऑडीटर चॉंद बेग यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयान्वये आम्ही तक्रार दिल्याने मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे ऑडीट करुन खोटा रिपोर्ट सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-

(सि. म. पाडोळीकर)
दि. २७.०१.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.